SHRI GULABRAO ESHWARA KHANDVE EDUCATIONAL FOUNDATION,

# JAGADGURU INTERNATIONAL SCHOOL, LOHEGAON, PUNE

**TERM 1 EXAM (2024-25)**

| | | |
|---|---|---|
| **Class: VII** | **Section: A** | **Subject: Marathi** |
| **Date: 26/ 09/2024** | | **Total Marks: 80** |
| **Roll No. : ____** | | **Time: 3 Hours** |

**General Instructions :**

i) **The Question Paper consists of Two sections- Reading and Comprehension Literature based questions and Grammar**

ii) **All questions are compulsory.**

iii) **Read the question carefully before attempting it.**

---

## विभाग अ - गुण ४०

**प्रश्न १अ ) खालील उतारा वाचा व त्याआधारे विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा .** गुण -५

आधुनिक भारताच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, औद्योगिक जडणघडणीत अनेकांचा मोठा वाटा आहे. राजकीय नेत्यांचा जसा देशाला दिशा देण्याचा वाटा महत्त्वाचा तसाच उद्योग उभारून देशाचं आर्थिक चाक मजबूत करणाऱ्या उद्योगपतींचा वाटाही तितकाच मोठा असतो. महान उदयोगपती जमशेदजी टाटा हे असेच एक उद्योगपती. रतन यांचा जन्म 28 डिसेंबर 1937 ला मुंबईत झाला. रतन टाटा यांनी विविध धोरणं अवलंबून वाढवलेला व्यवसाय आणि त्यांची परोपकारी वृत्ती यासाठी ते भारतातील सर्वांना परिचित आहेत. त्यांचं प्राथमिक शिक्षण मुंबईत झालं पण 1955 मध्ये त्यांनी न्यूयॉर्क सिटीतील रिव्हरडेल कंट्री स्कूलमधून पदवी घेतली. सन 1959 मध्ये न्यूयॉर्कमधील कॉर्नेल विद्यापीठातून त्यांनी आर्किटेक्चरची पदवी घेतली. रतन टाटांनी 1962 मध्ये टाटा ग्रुपमधून करिअरची सुरूवात केली, तेव्हा त्यांचं वय फक्त 24 होतं. पहिल्यांदा त्यांनी टाटा स्टीलच्या एका दुकानात कर्मचारी म्हणून काम केलं. त्यांच्या कारकीर्दित टाटा ग्रुपने टेटली, जग्वार ,लँड रोव्हर आणि कोरससारख्या कंपन्या विकत घेतल्या 2000 मध्ये त्यांना पद्मभूषण पुरस्कार देण्यात आला ,असावं अनेक मोठं मोठे पुरस्कार त्यांना देण्यात आले आहेत .

i) रतन टाटा यांचा जन्म कधी व कुठे झाला ?
ii) रतन टाटा हे त्यांच्या कोणत्या वृत्तीसाठी भारतातील सर्वांना परिचित आहेत ?
iii) रतन टाटा यांनी जेव्हा त्यांच्या करिअरची सुरुवात केली तेव्हा त्यांचे वय किती होते ?
iv) त्यांच्या कारकिर्दीत त्यांनी कोणकोणत्या कंपन्या विकत घेतल्या ?
v) रतन टाटा यांना 2000 मध्ये कोणता पुरस्कार देण्यात आला ?

**ब ) खालील उतारा वाचा व त्याआधारे विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा .** **गुण -५**

१३व्या शतकात, कागदाचा वापर हा चीनमधून मध्ययुगीन युरोपमध्ये पोहोचला व तेथे त्याचे उत्पादन सुरू झाले. तेथे पाण्यावर चालणारी पेपर मिल सुरू झाली व कागदाच्या निर्मितीत यांत्रिकीकरण आले. सर्व जगात, १९व्या शतकाच्या सुरुवातीस पत्रलेखन, वर्तमानपत्राची छपाई, पुस्तके इत्यादींसाठी कागदाचे औद्योगिक उत्पादन सुरू झाल्यामुळे संपूर्ण जगाच्या सांस्कृतिक क्षेत्रात अनेक महत्त्वाचे बदल झाले. सन १८४४ मध्ये, कॅनॅडियन संशोधक चार्लस फेनेर्टी व जर्मन संशोधक एफ.जी. केलर यांनी कागद बनविण्यासाठी यंत्रसामग्री व लाकडावर प्रक्रिया करून लगदा बनविण्याची पद्धत शोधून काढली. लाकडाच्या लगद्यापासून वर्तमानपत्राचा व अन्य सर्व प्रकारचा कागद बनविण्याचे नवे युग त्यामुळे सुरू झाले.छपाई, रंगकाम किंवा लेखन करण्यासाठी उपयुक्त अशा पांढऱ्या कागदाची निर्मिती लगद्यावर ब्लीचिंगची क्रिया करून करता येते. रासायनिक लगद्याची किंमत यांत्रिक लगद्यापेक्षा किंचित जास्त असते. कारण त्यात मूळ लाकडाच्या प्रमाणात ४० ते ५०% इतकेच उत्पादन होते. या पद्धतीत तंतूंच्या लांबीचे जतन होते. म्हणून रासायनिक लगदा हा बळकट कागद निर्माण करू शकतो. क्राफ्ट पद्धत ही लगदा तयार करण्याची एक सर्वसामान्य पद्धत आहे. ती वापरून बळकट व ब्लीच न केलेले कागद तयार करता येतात. त्यांचा थेट वापर कागदी पिशव्या व कागदी खोके बनविण्यासाठी होतो.

i) संपूर्ण जगाच्या सांस्कृतिक क्षेत्रात अनेक महत्त्वाचे बदल केव्हा झाले ?
ii) १३व्या शतकात, कागदाचा वापर हा चीनमधून कुठे पोहोचला ?
iii) लाकडावर प्रक्रिया करून लगदा बनविण्याची पद्धत कोणी शोधून काढली ?
iv) रासायनिक लगद्याची किंमत यांत्रिक लगद्यापेक्षा किंचित जास्त का असते ?
v) तुम्हाला माहित असलेले कागदाचे कोणतेही दोन उपयोग लिहा.

**व्याकरण -गुण २०**

**प्रश्न २. अ ) खालील वाक्यप्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा. ( कोणतेही २)** **गुण ४**

i) व्यर्थ न जाणे -
ii) निराश होणे -
iii) योगदान देणे -

**ब) सूचनेनुसार कृती करा .** **गुण ४**

i) अजयला गुरुजींनी एक गोष्टीचे पुस्तक दिले. ( वाक्याचा भविष्य काळ करा )
ii) मी सर्वांना मदत करणार. ( वाक्याचा वर्तमान काळ करा )
iii) शाम आपल्या घरी येत आहे. ( वाक्याचा भूतकाळ करा )
iv) आजोबा मला रोज गोष्ट सांगतात. ( वाक्याचा वर्तमान काळ करा )

**क) खालील वाक्यातील सर्वनाम ओळखा व लिहा.** **गुण ३**

i) ती तिच्या आईबरोबर घरी गेली .
ii) आज आम्ही पावसात भिजणार आहे.
iii) तू या पुस्तकातील एक गोष्ट वाच.

**प्रश्न ३. अ ) खालील वाक्यातील नाम ओळखा व लिहा.** **गुण ३**

i) मनोज आपल्या घरी आला.
ii) गंगा नदी सर्वात मोठी नदी आहे.
iii) कोणीही आजारी पडल्यावर ती आम्ही डॉक्टर देशपांडे यांच्याकडे जातो.

**ब) समानार्थी शब्द लिहा.** **गुण २**

i) विश्व - ii) नयन - iii) शिष्य - iv) वर्तमानपत्र -

**क) विरुद्धार्थी शब्द लिहा.** **गुण २**

i) पुत्र x ii) दुर्मिळ x iii) व्यावसायिक x iv) वैभव x

**ड) वचन बदला व लिहा .** **गुण २**

i) तलवार - ii) पठार - iii) भावंड - iv) अडचण

**साहित्य गद्य**

**प्रश्न ४. अ ) खालील उतारा वाचा व त्याआधारे विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा .** **गुण -५**

सातार्‍याच्या पश्चिमेकडे साधारणपणे 22 किलोमीटर अंतरावर सह्याद्री पर्वत रांगांच्या दरम्यान कास पठार वसलेले आहे. या पठारावरती असलेल्या कास तलावाद्वारे संपूर्ण सातारा शहराला पाणीपुरवठा केला जातो. एरवी बरड असलेले हे पठार पावसाळा येतात आपले रुपडे पालटते. अत्यंत दुर्मिळ अशा विविधरंगी रानफुलांनी हे पठार बहरून जाते. सुमारे 10 चौ. कि.मी च्या क्षेत्रात पसरलेले हे क्षेत्र 2012 साली युनेस्को तर्फे जागतिक वारसा स्थळ म्हणून घोषित करण्यात आले .सध्या याचे नियमन सातारा वन विभागाकडून केले जात आहे. येथे सुमारे 280 फुलांच्या प्रजाती आहेत आणि झाडे झुडपे वेली वनस्पती इत्यादी मिळून सुमारे 850 प्रजाती येथे नांदतात , म्हणूनच हे क्षेत्र जैवविविधतेचा हॉटस्पॉट ठरले आहे. याबरोबरच येथे 59 सरीसृप प्रकारचे प्राणी देखील आढळतात. विविध नष्ट होत चाललेल्या वनस्पतींच्या प्रजाती देखील येथे सापडतात. कास पठारावर साधारणपणे जून ते ऑक्टोबर दरम्यान ही विविध रंगी रानफुले फुलू लागतात.

i) संपूर्ण सातारा शहराला पाणीपुरवठा कोणत्या तलावा द्वारे केला जातो ?
ii) हे क्षेत्र 2012 साली युनेस्को तर्फे काय म्हणून घोषित करण्यात आले ?
iii) कास पठार हे क्षेत्र जैवविविधतेचा हॉटस्पॉट का ठरले आहे ?
iv) येथे किती प्रकारचे सरीसृप प्राणी आढळतात ?
v ) कास पठारावर साधारणपणे कधी विविध रंगी रानफुले फुलू लागतात ?

**ब ) खालील कविता वाचा व त्याआधारे विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा .** **गुण ५**

भारत देश एकदा माझ्या स्वप्नात आला
हुलके देत माझ्याशी बोलू लागला

काय सांगू किती सांगू कुणाकुणाला सांगू
माझी अवस्था मी कोणासमोर मांडू

जो तो येतो माझ्यावर कचरा टाकतो
परिसर सर्व अस्वच्छ करून जातो

शेतीप्रधान देश म्हणून माझे नाव घेतात
आणि माझ्याच देशात शेतकरी आत्महत्या करतात

रहदारीचे नियम फक्त नियमावलीतच ठेवतात
आपापल्या सोयीनुसार त्यांचा वापर करतात

रोज मात्र तुम्ही माझी प्रतिज्ञा घेता
या कानाने ऐकून त्या कानाने सोडून देता

i) शेतीप्रधान देश असूनही शेतकरी काय करतात ?
ii) कचरा टाकल्यामुळे काय होत आहे ?
iii) रहदारीचे नियम कशात ठेवले जातात ?
iv) रोज प्रतिज्ञा घेऊन आपण काय करतो ?
v) " स्वच्छ " शब्दाचा विरुद्धार्थी शब्द लिहा .

## विभाग ब - गुण ४०

**प्रश्न ५ . अ ) एका वाक्यात उत्तरे लिहा. ( कोणतेही ४ )** **गुण ४**

i) कास पठारावर भेट देण्याचा उत्तम काळ कोणता ?
ii) म्हातारी आजी सुकलेल्या पानांचे काय करत असे ?
iii) मेरीच्या जीवनावर तयार करण्यात आलेल्या चित्रपटाचे नाव काय होते ?
iv) डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे पूर्ण नाव काय होते ?
v) पारशी नववर्षाला काय म्हणतात ?

**ब) रिकाम्या जागा भरा.** **गुण ४**

i) तीनही शिष्यांनी गुरुजींना ------- केले.
ii) जंगलात सर्वत्र सुकलेली पाने ---------- असतात.
iii) मेरीने मणिपूर ची राजधानी ---------- येथे आपले महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केले.
iv) या पाचव्या महिन्यात चंद्र हा ---------- नक्षत्रात असतो .

**क) थोडक्यात उत्तरे लिहा. ( कोणतेही १ )** **गुण ३**

i) कास पठारावर ऑनलाइन बुकिंगची व्यवस्था का करण्यात आली आहे ?
ii) गुरुजींनी त्या शिष्याला कोणता मोलाचा सल्ला दिला ?
iii) मेरीने बॉक्सिंग क्षेत्रात कारकीर्द करण्यासाठी केलेला संघर्ष तुमच्या शब्दात मांडा.

## पद्य

**प्रश्न ६. अ ) एका वाक्यात उत्तरे लिहा.** **गुण ४**

i) साहित्यातला सर्वोच्च पुरस्कार कोणता आहे ?
ii) ज्ञानेशाची ओवी कशी आहे ?
iii) पावसाच्या सरीने काय भरून आले ?
iv) मराठीचे पान कोण फेडणार आहे?

**ब) थोडक्यात उत्तरे लिहा. ( कोणतेही १)** **गुण ३**

i) कोण कोणत्या गोष्टीमुळे मनात मराठीचा अभिमान वाढतो ?
ii) " मातृभूमीच्या नावाने छाताडे बडवता आणि तिच्याच डोळ्यात अश्रू आणता " या ओळींचा भावार्थ तुमच्या शब्दात लिहा.

**क) जोड्या लावा.** **गुण २**

| अ गट | ब गट |
|---|---|
| i) ज्ञानेशाची | अ) गाथा |
| ii) तुकोबाचा | ब) ओवी |
| iii) नामयाची | क) भारुड |
| iv) एकनाथांचे | ड) अभंग |

**प्रश् ७.अ) खालील पैकी कोणत्याही एका विषयावर सुमारे २००-२५० शब्दात निबंध लिहा .         गुण ८**

* माझा भारत ( जन्मभूमी - विविधता- भारतीय संस्कृती- थोर पुरुषांची जननी- देशाची प्रगती- माझा भारत महान

**किंवा**

* मी पक्षी झालो तर..... ( कल्पना कशी सुचली / कोणत्या पक्षी होणार / पक्षांचे जीवन / स्वच्छंदी जीवन / मर्यादा / मानवी जीवन याच्याशी तुलना )

**ब) दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे कथा लिहा . कथेला शीर्षक द्या व तात्पर्य लिहा .         गुण ७**

*एक म्हातारा वाघ - शिकार करण्याची शक्ती नाही - गुहेत पडून राहणे - प्राण्यांना मदतीस बोलवणे - आलेल्यांची शिकार करणे - एका कोल्ह्याने बाहेरच थांबणे - वाघोबा ने आत बोलावणे - कोल्ह्याने इतर प्राण्यांची हाडे व कातडी बघणे - कोल्ह्याने बाहेरूनच विचारपूस करणे - , कोल्ह्याची हुशारी

**किंवा**

*एका झाडावर कबूतर बसणे - दाणे टिपणे , पोट भरणे - एक वृद्ध व शहाणे कबूतर - सल्ला देणे सावध रहा, काळजी घ्या - शिकाऱ्याने जाळे व दाणे टाकणे - कबुतरांचे जाळ्यात अडकणे - , वृद्ध कबुतराला मदत मागणे - एकीचा सल्ला - एकता व एकीचे बळ दाखवा

**क) खालील विषयावर पत्र लिहा. ( लिफाफा आवश्यक )         गुण ५**

* मित्र / मैत्रिणीला तुमच्या नवीन शाळेची व मित्रांची माहिती देणारे पत्र लिहा.

**किंवा**

* तुम्ही केलेल्या सहलीचे वर्णन करणारे पत्र तुमच्या वडिलांना लिहा.